दै. सकाळ 6/7/2006




दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाउंट्स ऑफ इंडियाच्या औरंगाबाद शाखेतर्फे आयोजित वर्गाचे उद्‌घाटन नागेश नाडिग यांच्या हस्ते झाले. या वेळी विश्वेश्वर सेन, ए. पी. गोरे, आर. बी. मुळे, पी. के. खेमका, ए. आर. जोशी आदी.

# रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रम उपयुक्त

## नाडिग यांचे प्रतिपादन

**औरंगाबाद, ता. ६ :** 'जागतिकीकरणामुळे व्यावसायिक स्पर्धा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. यासाठी 'आयसीडब्ल्यूए'सारखे व्यावसायिक अभ्यासक्रम केल्यास उच्च पदावर काम करण्याची संधी हमखास मिळेल,' असे प्रतिपादन व्हेरॉक ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष (फायनान्स) नागेश नाडिग यांनी केले.

### आयसीडब्ल्यूएच्या वर्गाचे उद्‌घाटन

'दी इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाउंट्स ऑफ इंडिया'च्या औरंगाबाद शाखेतर्फे आयोजित 'आयसीडब्ल्यूए' वर्गाचे उद्‌घाटन श्री. नाडिक यांच्या हस्ते नुकतेच झाले. त्या वेळी ते बोलत होते. 'आयसीडब्ल्यूए हाअभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अभ्यासातील सातत्य आणि नियमितता तसेच सुयोग्य पद्धतीने वेळेचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे,' असे प्रतिपादन प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी केले. 'चॅप्टर'चे उपाध्यक्ष राजेश शुक्ला यांनी, शिक्षणाबरोबरच व्यावहारिक प्रशिक्षण महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट करीत विद्यार्थ्यांच्या उद्योगांना भेटी आयोजित करण्यात येतील, असे सांगितले. 'चॅप्टर'चे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी स्वागत केले. आर. बी. मुळी यांनी परिचय करून दिला. शिशिर भालचंद्र, आकाशचंद्र चौधरी, शीतल कदम या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आशीष देवढे यांनी केले. विश्वेश्वर सेन यांनी आभार मानले. या वेळी आर. जी. मोदानी, डी. बी. डबरी, पी. के. खेमका, प्रवण पटेल, एस. आर. पिंपळे, अनिल कुलकर्णी, मिलिंद देशपांडे, ए. जी. सुरडकर, रोहित रोंघे उपस्थित होते.

Felicitation Function